<u>निवडणूक तात्काळ</u>
ई-मेलद्वारे

माहे जून ते सप्टेंबर २०१८ मध्ये मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत सरपंच पदांसह सर्व सदस्य पदांसाठी तसेच रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१०/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल : sec.mh@gov.in
दिनांक: २३ एप्रिल, २०१८

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून).*

**विषय :- माहे जून ते सप्टेंबर २०१८ मध्ये मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत सरपंच पदांसह सर्व सदस्य पदांसाठी तसेच रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.**

संदर्भ :- १) आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.४/का-८, दि.१४/०२/२०१८ रोजीचा प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम.
२) आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.९ /का-८, दि.०३/०४/२०१८, १८/०४/२०१८ व २०/०४/२०१८ रोजीचे मतदार यादी कार्यक्रमासंबंधीचे निर्देश.
३) आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.७/का-८, दि.०४/०४/२०१८ रोजी निर्गमित केलेले निवडणूक पूर्वतयारी विषयक निर्देशपत्र.
४) सरपंच पदाच्या थेट निवडणुकीसंदर्भात शासनाने पुनर्प्रख्यापित केलेला दि. १६/०४/२०१८ रोजीचा अध्यादेश.

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या आदेशान्वये माहे जून ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम दि.१३/०४/२०१८ रोजी नमुना-अ प्रसिध्दीने अंतिम करण्यात आलेला आहे. तसेच या सार्वत्रिक निवडणुकांबरोबरच ग्रामपंचायतींतील रिक्त पदांसाठी पोट निवडणुकांचा कार्यक्रम राबविण्यासाठी प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम उक्त संदर्भ क्र.२ मधील

दि. २०/०४/२०१८ च्या आदेशान्वये निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार दि.२७/०४/२०१८ पर्यंत संबंधित ठिकाणी प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिध्द होणार आहेत.

२. माहे जून ते सप्टेंबर २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत. याचा सविस्तर तपशील **परिशिष्ट-अ** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

३. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयांकडून प्राप्त अहवालानुसार जिल्हानिहाय ग्रामपंचायतींच्या रिक्त पदांचा तपशील सोबत **परिशिष्ट-ब** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

४. ग्रामपंचायतींचा सार्वत्रिक व पोट निवडणुकीच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक **परिशिष्ट-क** मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

५. **सार्वत्रिक व पोट निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये आज रोजी रात्री १२.०० वाजल्यापासून आचारसंहिता लागू होईल. आयोगाच्या दि.०६/०९/२०१७ रोजीच्या ग्रामपंचायत निवडणुकांसंदर्भातील अतिरिक्त आदेशानुसार आदर्श आचारसंहिता त्या-त्या ठिकाणच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. या क्षेत्रातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा मंत्री, खासदार, आमदार व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहिता कालावधीत कुठेही करता येणार नाही.**

६. **माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या पोट निवडणुकीमध्ये ज्या सरपंच तसेच सदस्यांच्या रिक्त पदांसाठी एकही नामनिर्देशनपत्र विहीत मुदतीत तांत्रिक कारणामुळे प्राप्त झाले नाही, अशा ठिकाणी आयोगाच्या दि.१२/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये निवडणूक नोटीस रद्द करण्यात आलेली आहे, अशा पदांचा समावेशही सदर निवडणूक कार्यक्रमात करण्यात यावा.**

७. तसेच सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींच्या बाबतीत सरपंच थेट पध्दतीने निवडून द्यावयाचे असल्याने निवडणूक आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत विशेष उपाययोजना करावी. तसेच प्रत्यक्ष मतमोजणीच्या वेळी संवेदनशील मतमोजणी केंद्राच्या परिसरात विशेष पोलीस बंदोबस्त पुरविण्याची दक्षता घेण्यात यावी.

८. या निवडणुकीसंदर्भात नामनिर्देशनपत्रे भरण्याचे व निवडून आल्याबाबतचे प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही संगणकीकृत पध्दतीने राबविण्यात यावा. यासाठी आयोगाकडून दि.०४/०४/२०१८ रोजी निवडणूक पूर्वतयारी विषयक दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

९. सोबतच्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे **फक्त गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांकरीता मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० अशी राहील व इतर सर्व संबंधित जिल्ह्यांत मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल.**

१०. निवडणूक कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखाद्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकीसंदर्भात न्यायालयाचे किंवा विभागीय आयुक्त (अपिलासंदर्भात) यांच्या स्तरावरून देण्यात आलेले स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास त्याबाबत आपल्या स्तरावर लगेच कार्यवाही करुन त्याप्रमाणे आयोगास तात्काळ सूचित करावे. याबाबतची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल.

११. सदर निवडणूक कार्यक्रमानुसार संबंधित ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरून उपविभागीय अधिकाऱ्यांना निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्त करण्यात यावे.

१२. वरील निर्देशांव्यतिरिक्त सदर निवडणूक कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना आयोगाने दि.१४/१०/२०१६ व दि.०६/०९/२०१७ रोजी निर्गमित केलेल्या **आचारसंहिता विषयक आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

१३. ग्रामपंचायतींची निवडणुक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी पद्धतीने पार पाडण्याच्या दृष्टीने आयोगाकडून नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१४. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| संकेतस्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी कमांक | ०२२-२२८८६९५०, २२८४६७२०, २२०४५०७५ |
| ई मेल ॲड्रेस | sec.mh@gov.in |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

(स्वाक्षरी)

सोबत- परिशिष्टे - अ, ब आणि क

(र. ध. बेले)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत : १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, वित्त विभाग, सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

४. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५. **प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**यांना कळविण्यात येत आहे की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करून त्यांना तात्काळ उपलब्ध करून द्यावे.**

६. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी.

७. **संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.**

**यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहीत वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.**

८. पोलीस महानिरीक्षक (सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य.

९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व संबंधित)

१०. जिल्हा पोलिस अधिक्षक (सर्व संबंधित)

११. सहायक आयुक्त, संगणकीकरण शाखा, रानिआ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

१२. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, यांना उचित कार्यवाहीसाठी.

१३. राज्य निवडणूक आयोगाची सर्व कार्यासने

१४. निवड नस्ती (२ प्रती).

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१०/का-८, दि.२३/०४/२०१८ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

*परिशिष्ट-अ*

मतदान दि.२७/०५/२०१८

## जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार माहे जून २०१८ ते सप्टेंबर २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींचा जिल्हानिहाय तपशिल.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रा.पं. संख्या |
|---|---|---|---|
| १ | | ठाणे | ०५ |
| २ | | पालघर | ०३ |
| ३ | कोकण | रायगड | १८७ |
| ५ | | सिंधुदुर्ग | ०२ |
| | कोकण विभाग एकूण | | १९७ |
| ६ | | नाशिक | २० |
| ७ | | धुळे | ०७ |
| ८ | नाशिक | जळगाव | ०८ |
| ९ | | अहमदनगर | ७७ |
| | नाशिक विभाग एकूण | | ११२ |
| १० | | पुणे | ९० |
| ११ | | सोलापूर | ०३ |
| १२ | पुणे | सातारा | २३ |
| १३ | | सांगली | ८२ |
| १४ | | कोल्हापूर | ७४ |
| | पुणे विभाग एकूण | | २७२ |
| १५ | | औरंगाबाद | ०४ |
| १६ | | बीड | ०२ |
| १७ | | नांदेड | ०७ |
| १८ | औरंगाबाद | परभणी | ०१ |
| १९ | | उस्मानाबाद | ०३ |
| २० | | लातूर | ०५ |
| | औरंगाबाद विभाग एकूण | | २२ |
| २१ | अमरावती | अकोला | ०२ |
| २२ | | यवतमाळ | २९ |
| | अमरावती विभाग एकूण | | ३१ |
| २३ | | वर्धा | १४ |
| २४ | | भंडारा | ०४ |
| २५ | नागपूर | गडचिरोली | ०२ |
| | नागपूर विभाग एकूण | | २० |
| | एकूण | | ६५४ |

(क्रमांकःरानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१०/का-८, दि.२३/०४/२०१८ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

*परिशिष्ट-ब* - मतदान दि.२७/०५/२०१८

## जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी ग्रामपंचायतींचा जिल्हानिहाय तपशिल.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | रिक्त पदे असलेल्या ग्रा.पं. संख्या | पोट निवडणुका असलेल्या एकूण रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | ९० | १६७ |
| २ | | पालघर | ७३ | १४४ |
| ३ | | रायगड | ९३ | १५८ |
| ४ | | रत्नागिरी | २०२ | २९९ |
| ५ | | सिंधुदुर्ग | ७४ | १०४ |
| **कोकण विभाग एकूण** | | | **५३२** | **८७२** |
| ६ | नाशिक | नाशिक | २०० | ३१८ |
| ७ | | धुळे | ३४ | ४९ |
| ८ | | जळगाव | ५७ | ९६ |
| ९ | | नंदुरबार | ३२ | ३६ |
| १० | | अहमदनगर | ७८ | १२४ |
| **नाशिक विभाग एकूण** | | | **४०१** | **६२३** |
| ११ | पुणे | पुणे | २५८ | ४५६ |
| १२ | | सोलापूर | ९३ | १५४ |
| १३ | | सातारा | ४०९ | ७७७ |
| १४ | | सांगली | ४० | ८१ |
| १५ | | कोल्हापूर | ८७ | १२६ |
| **पुणे विभाग एकूण** | | | **८८७** | **१५९४** |
| १६ | औरंगाबाद | औरंगाबाद | ३४ | ४१ |
| १७ | | बीड | २४ | ३५ |
| १८ | | नांदेड | १०६ | १७७ |
| १९ | | परभणी | २८ | ४० |
| २० | | उस्मानाबाद | ४८ | ६५ |
| २१ | | जालना | २१ | २८ |
| २२ | | लातूर | ७९ | ९४ |
| २३ | | हिंगोली | ४१ | ५५ |
| **औरंगाबाद विभाग एकूण** | | | **३८१** | **५३५** |
| २४ | अमरावती | अमरावती | ८० | १२१ |
| २५ | | अकोला | २३ | ३१ |
| २६ | | यवतमाळ | ११० | १६७ |
| २७ | | वाशीम | २० | २३ |
| २८ | | बुलडाणा | ३९ | ७२ |
| **अमरावती विभाग एकूण** | | | **२७२** | **४१४** |
| २९ | नागपूर | वर्धा | ४९ | ७२ |
| ३० | | चंद्रपूर | ७४ | १०६ |
| ३१ | | भंडारा | ६ | ४८ |
| ३२ | | गोंदिया | ३५ | ४३ |
| ३३ | | गडचिरोली | १७५ | ४६४ |
| **नागपूर विभाग एकूण** | | | **३३९** | **७३३** |
| **एकूण** | | | **२८१२** | **४७७१** |

*(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१८/प्र.क्र.१०/का-८, दि.२३/०४/२०१८ च्या पत्रासोबतचे सहपत्र)*

परिशिष्ट-क

राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेला माहे जून २०१८ ते सप्टेंबर २०१८ मध्ये मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत सरपंच पदांसह सर्व सदस्य पदांसाठी तसेच रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.२७/०४/२०१८ (शुक्रवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.०७/०५/२०१८ (सोमवार) ते दि.१२/०५/२०१८ (शनिवार) वेळ स. ११.०० ते दु. ४.३० |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१४/०५/२०१८ (सोमवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१६/०५/२०१८ (बुधवार) दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.१६/०५/२०१८ (बुधवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | **दि.२७/०५/२०१८ (रविवार)** **स.७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत** ***(गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यासाठी स.७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत)*** |
| ७ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | दि.२८/०५/२०१८ सोमवार) |
| ८ | निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक (ज्या ग्रामपंचायतींची मुदत दि.०१/०६/२०१८ रोजी संपत आहे, अशा ग्रामपंचायतींच्या निवडणूक नियम ३७ प्रमाणे निकालाची प्रसिध्दी मंगळवार दि.२९/०५/२०१८ रोजीच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्याची दक्षता घ्यावी.) | दि.२९/०५/२०१८ (मंगळवार) ते (गुरुवार) दि. ३१/०५/२०१८ पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

रधबेले

(र. ध. बेले)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

C:\Users\vinod.chavan\Desktop\ग्रापंनि- माहे जून ते सप्टेंबर 2018 निवडणूक कार्यक्रम....docx